**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/ CR.९२/DisM-१ दि.१७/०४/२०२०
५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०२/०५/२०२० व ०३/०५/२०२०.
६) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२३/२० दि.०३/०५/२०२०.
७) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि. /०५/२०२०.
८) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१६/०५/२०२०.
९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१७/०५/२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२४/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक १७/०५/२०२०

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक असल्याने उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक १७/०५/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.९ अन्वये महाराष्ट्र शासन यांनी दि.३१/०५/२०२० पर्यंत राज्यामध्ये लॉकडाऊन लागू राहील असे जाहीर केले आहे. तसेच शासनाचे दिनांक ०२/०५/२०२० रोजीच्या आदेशानुसार पालघर जिल्हयाचा समावेश **"Red Zone"** मध्ये करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी व जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये पारीत केलेला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दि.३१/०५/२०२० पर्यंत लागू ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयामध्ये **दिनांक १८/०५/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक ३१/०५/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे.**

**सदरहू आदेश लागू झाल्यापासून उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये दिनांक ०३/०५/२०२० रोजीच्या आदेशामधील नमूद नियमावली व उपाययोजना लागू रहातील.** तसेच सदरहू आदेशामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

१) उपोद्घातातील अ.क्र.७ अन्वये पुढील कालावधीत पावसाळा मान्सून सुरु होणार असल्याने छत्री, रेन कोट, प्लास्टिक सिटस/कव्हर्स यांचा समावेश दिनांक ३०/०९/२०२० पर्यंत अत्यावश्यक वस्तूमध्ये करण्यात आलेला आहे.

२) उपोद्घातातील अ.क्र.६ मधील परिच्छेद क्र.६(ब)(७) मध्ये उपोद्घातातील अ.क्र.८ अन्वये पालघर जिल्हयातील वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील **प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) वगळता** दुय्यम निबंधक कार्यालये पाच व्यक्तीपर्यंतच्या उपस्थितीसह सुरु राहतील तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालये १०% कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसह सुरु राहतील.

३) उपोद्घातातील अ.क्र.६ मधील परिच्छेद क्र.७ मध्ये शासनाचे दिनांक १७/०४/२०२० रोजीच्या मार्गदर्शक तत्वान्वये **मत्स्यव्यवसाय विषयक खालील बाबी सुरु राहतील.**

१) मत्स्यव्यवसायाशी निगडीत (Marine and Inland) उद्योग, उत्पादन, संकलन, प्रक्रिया, वितरण आणि विक्री तसेच मत्स्यव्यवसायासाठी संबंधित मत्स्य/कोळंबी पदार्थाची वाहतूक व पुरवठा करणारे व त्यावर आधारित असणारे व्यवसाय/ त्यासंबंधातील पुरवठा साखळी.

२) मस्त्यबिज केंद्र, मत्स्यखाद्य व देखभाल, व्यावसायिक मत्स्यालय, अंडी उबवन केंद्र (Hatcheries) यांचा व इतर अनुषांगिक बाबींचा समावेश असेल.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधिताना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक १७/०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) गट विकास अधिकारी पंचायत समिती वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.
१३) मुख्याधिकारी, नगरपरीषद/नगरपंचायत पालघर/जव्हार/डहाणू/मोखाडा/विक्रमगड/वाडा/तलासरी यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४) पालघर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळे/खाजगी आस्थापना यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हादंडाधिकारी पालघर**